



# ॥ ज्योतिर्मय ॥

Online Journal of Literature....

साहित्याचे विद्यापीठ

❑ पुणे ❑ वर्ष १ ले ❑ अंक १८३ वा ❑ शनिवार दि.०६ सप्टेंबर २०२५ ❑ पाने ४ ❑ मूल्य : निशुल्क (खासगी वितरणासाठी)


## शिक्षक हे विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे शिल्पकार - प्रकाशराव सोनवणे





**छत्रपती संभाजीनगर –** ज्ञान संदीप शिक्षण संस्था संचलित संत तुकाराम प्राथमिक विद्यालय व तुकाराम सोनवणे हायस्कूल, डॉ. आंबेडकर नगर, सिडको एन–७, छत्रपती संभाजीनगर येथे ५ सप्टेंबर २०२५ रोजी शिक्षक दिन अत्यंत उत्साह, आनंद आणि स्नेहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला.

कार्यक्रमाची सुरुवात भारतरत्न व माजी राष्ट्रपती डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. मान्यवरांनी प्रतिमेला अभिवादन करताना शिक्षकांविषयी कृतज्ञता व्यक्त केली. उपस्थित विद्यार्थी व शिक्षकांनी ‘‘गुरुर्ब्रह्मा गुरुर्विष्णु...’’ या मंत्रोच्चारात सामील होत वातावरण अधिक पवित्र केले. संस्थेचे अध्यक्ष प्रकाशराव सोनवणे यांनी सांगितले ‘‘शिक्षक हे विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे शिल्पकार आहेत. शिक्षकांशिवाय समाजाची उभारणीच अशक्य आहे. विद्यार्थ्यांनी कृतज्ञतेने गुरुजनांचा सन्मान केला पाहिजे.’’ हायस्कूलचे मुख्याध्यापक संदीप सोनवणे यांनी मार्गदर्शन करताना विद्यार्थ्यांना प्रेरणा देत सांगितले ‘‘शिक्षक हे दीपस्तंभासारखे आहेत. ते स्वतः जळतात पण विद्यार्थ्यांच्या जीवनात प्रकाश फुलवतात. शिक्षक दिन हा आपल्या संस्कृतीतील गुरुशिष्य परंपरेची जाणीव करून देणारा दिवस आहे.’’

**स्वयंसंचालित शाळा नववी–दहावीचा अभिनव उपक्रम**

या विशेष दिनी इयत्ता नववी व दहावीच्या विद्यार्थ्यांनी स्वयंसंचालित शाळा चालवण्याचा प्रयोग केला. या उपक्रमामुळे शाळेत उत्सुकतेचे आणि आनंदाचे वातावरण निर्माण झाले. प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका म्हणून कु. पायल मिसाळ तर हायस्कूलचे मुख्याध्यापक म्हणून सुमित खंडाळे यांनी जबाबदारी पार पाडली. छात्र–प्राचार्य सुमित खंडाळे म्हणाले ‘‘आज आम्ही प्रत्यक्ष शिस्त राखली, वर्ग शिकवले आणि विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. या अनुभवामुळे शिक्षकांची जबाबदारी किती मोठी असते हे समजले.’’ छात्र–प्राचार्या पायल मिसाळ म्हणाली ‘‘लहान मुलांना शिकवताना संयम, प्रेम आणि मायेची किती गरज भासते हे जाणवले. आज आम्ही शिक्षकांसारखे काम करताना त्यांचा आदर अधिकच वाढला.’’ इतर विद्यार्थी सहछात्र अध्यापक म्हणून विविध विषयांचे अध्यापन करत होते. काहींनी गणित शिकवले, काहींनी मराठी कथा सांगितली तर काहींनी इंग्रजीतील धडे शिकवले. छोट्या विद्यार्थ्यांनीही या अध्यापनात आनंदाने सहभाग घेतला.

संस्थेचे अध्यक्ष प्रकाशराव सोनवणे यांनी सर्व छात्र–अध्यापकांचा पुष्पगुच्छ देऊन गौरव केला आणि म्हणाले ‘‘आज तुम्ही सर्वांनी शिक्षकांची भूमिका निभावत दाखवलीत. उद्या तुम्ही समाजातील प्रेरणादायी व्यक्ती बनाल यात शंका नाही.’’ या कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी मनोगते व्यक्त केली. सायमा शेख म्हणाली ‘‘शिक्षक आमच्या आयुष्यातील खरे मित्र आहेत. त्यांच्याशिवाय ज्ञानाची वाटचाल अपुरीच ठरली असती.’’ प्रेम शिंदेने नमूद केले ‘‘शिक्षक हे खरे मार्गदर्शक आहेत. आम्ही आज जे शिकलो ते त्यांच्या शिकवणुकीमुळेच शक्य झाले.’’ सम्राट भामरे म्हणाला ‘‘आज आम्ही शिक्षकांचे ऋण मान्य केले. त्यांच्या त्यागामुळेच आम्ही भविष्यात प्रगती करू शकतो.’’ शिक्षक संजीव चौधरी आणि वैशाली बागुल यांनी विद्यार्थ्यांना प्रेरणादायी भाषणे करून मेहनत, शिस्त आणि प्रामाणिकपणा या गुणांचे महत्त्व पटवून दिले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नववीतील विद्यार्थिनी स्नेंहल मोरे हिने केले. तिच्या ओघवत्या व आकर्षक सादरीकरणामुळे कार्यक्रमात उत्साह निर्माण झाला. आभार प्रदर्शन मोनिका मगरे हिने करून सर्वांचे आभार मानले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी सुनील चौधरी, नजमा खान, विजय पाटील, साहेबराव शिंदे, हर्षल पगारे, वैशाली बागुल यांनी विशेष परिश्रम घेतले. शिक्षक दिनाच्या निमित्ताने घेतलेला हा अभिनव उपक्रम म्हणजे केवळ एक औपचारिक कार्यक्रम नव्हता, तर विद्यार्थ्यांसाठी जीवनाला दिशा देणारा अनुभव ठरला. पालक, शिक्षक व मान्यवरांनीही विद्यार्थ्यांच्या या प्रयत्नांचे कौतुक केले आणि अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये जबाबदारीची जाणीव, नेतृत्वगुण आणि कृतज्ञतेची भावना वाढीस लागते, असा विश्वास व्यक्त केला.

---

विशेष लेख...

## भारतातील घटत्या जन्मदराचे मोठे संकट !

– प्रा डॉ सुधीर अग्रवाल

ज्योतिर्मय साहित्य

लोकसंख्येच्या बाबतीत चीनला मागे टाकणारा आपला देश जन्मदराच्या बाबतीत मागे पडत आहे हे ऐकून तुम्हाला आश्चर्य वाटेल. हे भारतासाठी चांगले लक्षण नाही. भारतात जन्मदर प्रति महिला १.९ आहे. हे सामान्यपेक्षाही कमी असल्याचे म्हटले जाते. उदाहरणार्थ, जपान अशा परिस्थितीचा सामना करत आहे.भारत हळूहळू वृद्धत्वाकडे वाटचाल करत आहे. देशाचा एकूण प्रजनन दर कमी झाला आहे. पहिल्यांदाच, ग्रामीण भारतातील एकूण प्रजनन दर २.१ वर पोहोचला आहे. हा रिप्लेसमेंट रेट आहे, जिथे एक पिढी स्वतःची जागा घेते, ज्यामुळे लोकसंख्या स्थिर राहते. नमुना नोंदणी प्रणाली () च्या २०२३ च्या अहवालानुसार, देशातील कार्यरत वयाच्या लोकसंख्येचे प्रमाण (१५–५९ वर्षे) वाढत आहे, तर ०–१४ वयोगटातील लोकसंख्येमध्ये सतत घट होत आहे.

अहवालानुसार, १९७१ ते १९८१ दरम्यान, ०–१४ वयोगटातील मुलांचा वाटा ४१.२ टक्क्यांवरून ३८.१ टक्क्यांवर घसरला, तर १९९१ ते २०२३ दरम्यान हा आकडा ३६.३ टक्क्यांवरून २४.२ टक्क्यांवर घसरला.

भारताचा प्रजनन दर १.९ वर कायम आहे

भारताच्या रजिस्ट्रार जनरलने जारी केलेल्या एसआरएस डेटावरून असे दिसून येते की देशाचा एकूण प्रजनन दर १९७१ मध्ये ५.२ वरून २०२३ मध्ये १.९ पर्यंत कमी झाला आहे. एसआरएसमध्ये सुमारे ८८ लाख लोकसंख्येचा नमुना समाविष्ट आहे आणि तो जगातील सर्वात मोठ्या लोकसंख्याशास्त्रीय सर्वेक्षणांपैकी एक आहे.

अहवालात असे दिसून आले आहे की दिल्लीच्या ग्रामीण भागाशिवाय, देशातील सर्व राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांमध्ये ०–१४ वयोगटातील मुलांची संख्या मुलींपेक्षा जास्त आहे, जिथे मुलींचे प्रमाण जास्त आहे.

काम करणाऱ्या लोकांचे प्रमाण १९७१ मध्ये ५३.४ टक्क्यांवरून २०२३ मध्ये ६६.१ टक्क्यांपर्यंत वाढण्याचा अंदाज आहे. सर्वाधिक टक्केवारी दिल्लीमध्ये (७०.८ टक्के) आहे, त्यानंतर तेलंगणा (७०.२ टक्के) आणि आंध्र प्रदेश (७०.१ टक्के) आहे, तर सर्वात कमी बिहारमध्ये (६०.१ टक्के) नोंदवले गेले आहे. शहरी भागात, ही श्रेणी ६८.८ टक्के आहे, तर ग्रामीण भागात, ही संख्या ६४.६ टक्के आहे. काम करणाऱ्या वयोगटात जम्मू आणि काश्मीरमध्ये ग्रामीण महिलांचा वाटा सर्वाधिक आहे आणि आसाममध्ये, शहरी पुरुषांचा वाटा सर्वाधिक आहे.

वृद्धांच्या संख्येत वाढ

वृद्धांची संख्या देखील वाढली आहे, २०२३ मध्ये ६० वर्षे आणि त्याहून अधिक वयाच्या लोकसंख्येचे प्रमाण ९.७ टक्के होते. केरळ (१५.१ टक्के), तामिळनाडू (१४ टक्के) आणि हिमाचल प्रदेश (१३.२ टक्के) या श्रेणीत आघाडीवर आहेत.

एसआरएस अहवाल दर्शवितो की भारताचा एकूण प्रजनन दर २०१९ मध्ये प्रतिस्थापन पातळीपर्यंत पोहोचला होता. २०२० मध्ये तो २.० वर होता. टीएफआर म्हणजे एका महिलेने तिच्या प्रजनन वर्षांमध्ये सरासरी किती मुले जन्माला घातली आहेत. सर्वेक्षणात असे दिसून आले आहे की भारतातील प्रत्येक महिला सरासरी एका मुलीला जन्म देत आहे जी प्रजनन वयापर्यंत जगते आणि मुले जन्माला घालते. ग्रामीण जीआरआर (१.०) शहरी जीआरआर (०.७) पेक्षा किंचित जास्त आहे.

लोकसंख्येत होणारी घट ही चिंताजनक असून ज्याप्रमाणे सरकारने कुटुंब नियोजनासाठी जागरूकता मोहिमा सुरू केल्या, त्याचप्रमाणे लोकांना मुलांना जन्म देण्यासाठी प्रोत्साहित करण्याची गरज आहे. तसेच, लैंगिक समस्या इत्यादींकडे दुर्लक्ष करण्याऐवजी, डॉक्टरांचा सल्ला घ्यावा.

---

## माझे सोबती

ज्योतिर्मय साहित्य

प्राणी आणि पक्षी म्हणजे निसर्गाचा एक अविभाज्य भाग ! अगदी लहानपणी आपल्याला एक घास काऊचा एक चिऊचा.. मनीमाऊ..



मोत्या भाऊ.. वगैरे बडबडगीतातून त्यांची ओळख होत असते !

मला अगदी लहानपणापासूनच हे सगळे प्राणी आवडतात. सगळ बालपण सांगलीला गेल्यामुळे आजूबाजूला, शेजारच्या परिसरात भटकंती करणारा सगळा प्राणीवर्ग हा मित्रवर्ग होताच. ज्यांनी ती कुत्री पाळलेली असायची ती त्यांच्या घरी कमी आणि आमच्या घरातच वस्ती ठोकून असायची.



वर्षा बेंडिगेरी कुलकर्णी
पुणे, ९७६७५८८९३७

आमच्या घराच्या मागच्या बाजूला काही भाजीपाला लावला होता तिथे तर चक्क ससे आणि मोरपण यायचे!

एकदाच एक मांजर पाळावं लागलं!.. म्हणजे मैत्रिणीनं ते एवढस कापसाच बोचकं आणल आणि त्यांची बदली झाली म्हणून मी ते ताब्यात घेतल.. पांढरं शुभ्र.. एवढासा जीव.. सायकलवरून पिशवीत घालून घरी घेऊन आलेली आठवतय.. ती फ्लॅट संस्कृती नव्हती त्यामुळे प्राणी मनसोक्तपणे वावरायचे बंगल्याभोवतीच्या कंपाऊंडमधे..

हे पिलू फारच जिवाभावाचं झालं होतं.. ते ही अगदी चलाख हुशार होतं.. त्याच नाव ठेवलं गणू. दूध न आवडणारं हे एक वेगळच मांजर असेल.! प्रचंड शिकारी होतं.

रोज कुठे कुठे जाऊन कोंबड्यांची पिल्लं उचलून आणायच.. एकदा तर साप घेऊन घरात आलं.. कधी सरडे.. पाली.. कधी काय! आणि त्या सगळ्या शिकारीचा फडशा पाडायच ठिकाण म्हणजे मी झोपायची त्या कॉटच्या खाली !

त्यामुळे अर्थातच आई खूप रागवायची मला! पण हा गणोबा सगळ्यांचाच अति लाडोबा झाला होता..याच्या भरपूर मजेशीर गोष्टी आठवतायत! एवढ्या लिहित बसण कठिण. त्यानंतर लग्न झाल्यावर औरंगाबाद, सातारा इथे फारसे हे प्राणिमात्र मिळाले नाहीत! पण रत्नागिरीत मांजर हा प्राणी जिथे तिथे सर्वत्र भेटला.. तिथे प्रत्येक घरी बहुतेक मांजरं पाळतातच.. त्यामुळे आम्हाला न पाळताच त्यांचा लळा लागायचाच.. कारण त्यांचे मुक्काम आमच्याच घरी असायचे.

पण हे सगळे बोकोबा होते.. मोठे मिजास खोर.. पण तितकेच प्रेमळ जीव लावणारे. पण एकाही मांजराने चुकूनही चोरी केली नाही.. दुधाच्या पातेलीकडे पाहिलही नाही.! आपल्या बशीत दिलेलं निमूटपणे हे खायचे! मला एकही चोरटं माऊ भेटलं नाही एवढ्या मांजरात.

त्यांनतर पुण्याला येताना जीव कसाकसा झाला.. कारण आता आम्हाला फ्लॅट मधे रहायला लागणार होतं!त्यामुळे मांजर कसं भेटणार हा प्रश्न होता.

माझ्या दोन्हीही मुलांना माझ्यासारखच प्राणी, पक्षी वेड आहेच..

(क्रमशः)

---


## वास्तुशास्त्र पेंटिंग

लघुलेख-३६



आपण 'वास्तुशास्त्र पेंटींग' निर्माण करण्यासाठी कुंडली शास्त्रातील बऱ्याच महत्त्वाच्या घटकांचा उपयोग करतो तथापि 'नक्षत्र' आणि 'नक्षत्र स्वामी किंवा 'नक्षत्र देवता' तसेच नक्षत्राचा 'आराध्य वृक्ष' या तीन अत्यंत प्रभावी घटकांचा उपयोग अधिकाधिक प्रमाणात करतो.

प्रत्येकाने स्वतःच्या नक्षत्र देवतेची पूजा, अर्चा, जप, मंत्रपठण जर नियमित केल्यास त्याला भौतिक आणि पारमार्थिक लाभ, सुख प्राप्त होते, असा आपल्या पूर्वजांचा फार प्राचीन काळापासूनचा अनुभव आहे. आजच्या धावपळीच्या जीवनांत हे मंत्र, जप, पूजापाठ करणं न जमणाऱ्यांची संख्या शेकडोत नाही तर लाखो-करोडो मध्ये आहे म्हणून यावर उपाय म्हणजे "वास्तुशास्त्र पेंटींग" आहे. होऊ शकतो. हे गेल्या २० वर्षांपासूनचे माझे स्वतःचे निरिक्षण आहे.

अनोळखी व्यक्ती असेल तर आपण संवाद साधत नाही किंवा कमी किंवा गरजेपुरताच बोलतो. परंतु त्याच अनोळखी व्यक्तीचा सहवास वाढत गेला तर त्या अनोळखी व्यक्तीला आपण नियमित पहात - बोलत असल्याने तिच्या बरोबरचं 'अनोळखीपण' कमी कमी होत जातं. आणि संवादाचं रूपांतर 'सुसंवादात' होतं. पुढे हाच 'सुसंवाद' एकमेकांचा 'जीवा-भावाचा' बनतो आणि एक वेळ अशी येते की, एकमेकांबद्दल प्रेम - जिव्हाळा - आत्मियता - ओढ - आपलेपणा निर्माण होतो. याच नैसर्गिक भावनांव्दारे 'वास्तुशास्त्र-पेंटींग' बद्दल आपल्याला प्रेम-आपलेपणा- जिव्हाळा निर्माण होतो. इतका की रोजच्या धकाधकीत आपल्याला रोजचे धार्मिक पूजा-पाठ, जप, मंत्र पठण इ. करायलाही वेळ नसतो. अशा वेळी आपल्या कुंडलीतील वर उल्लेख केलेल्या घटकांमुळे निर्माण केलेले "वास्तुशास्त्र पेंटींग" जे आपण आपल्या वास्तु मध्ये ठराविक लावलेले असते.आपण धावपळीत का होईना... पण जेव्हा त्याच्याकडे पहातो... तेव्हा ते पेंटींग देखील आपल्याकडेच पहात असते. (म्हणून तर आपणांस ते दिसते) त्यामुळे त्यात वापरलेले, आपल्या कुंडली नुसार, वास्तु नुसार जे कुंडली घटक जे 'सकारात्मकत्ता' निर्माण करणारेच असतात... तेच आपण पहात असल्यामुळे आपल्या डोळ्यांच्या 'रेटीना' द्वारे आपल्या मेंदू पर्यंत त्या पेंटींग मधील सकारात्मकता निर्माण करणारे 'रंगाकार' पोहोचतात. येथेच आपणास रोजचे जप, मंत्र पठन, पूजाअर्चा इ. जे जमत नाही पण ते जर केले असते तर जो, सकारात्मक परिणाम प्राप्त झाला असता तो केवळ, या पेंटींग कडे पहाण्याने प्राप्त होतो आणि आपल्या जीवनातील अडथळे कमी कमी होण्यास प्रारंभ होते

क्रमशः.....

द्वारा एस्.व्ही.एस्. कला प्रतिष्ठान
डॉ. गजानन शेपाळ : 98691 30238




# जात्यावरच्या ओव्या......

पान खाऊ खाऊ
ओठाला पडले वण
बंधूच्या सारखा
राजा कचेरीला कोण? ॥२४५॥

लेकीचं लगन
लगबग दळणाची,
सुपातून उडे
खडे, काचोळी गव्हाची ॥२४६॥

संदर्भ - शांताई इंगळे
संकलन - सौ. मनोरमा बोराडे
सहशिक्षिका, छत्रपती संभाजीनगर

# शब्द खेळांचे सांगती अर्थ आयुष्याचा...!




ज्योतिर्मय साहित्य

या प्रसंगी मला विराट कोहलीच्या शब्दांची आठवण होते. भारताने विराटच्या नेतृत्वाखाली जिंकलेला २०२४ चा वर्ल्ड कप अजूनही सर्वांच्या स्मरणात ताजा आहे. प्रसंग अत्यंत आणीबाणीचा होता. भारत यावेळी पराजयाच्या वाटेवर होता. दक्षिण आफ्रिका जिंकण्याच्या निर्णायक स्थितीत होती. पण शेवटच्या पाच षटकात विजयाचा घास भारतीय संघाने त्यांच्या तोंडून काढून घेतला. त्या वेळची भारतीय खेळाडूंची मनःस्थिती आणि विराट कोहलीने व्यक्त केलेली प्रतिक्रिया आपल्याला खूप काही सांगून जाणारी आहे. त्या ऐतिहासिक क्षणी विराट कोहलीने जेव्हा यशाचं रहस्य विचारल्यावर ''पुट युअर हेड डाउन अँड रिस्पेक्ट द सिचुएशन'' असं सांगितलं, तेव्हा त्या एका वाक्यानं संपूर्ण जीवनाचं सार व्यक्त झालं आहे असं मला वाटतं. आपलं डोकं शांत ठेवा आणि समोर असलेल्या परिस्थितीचा आदर करा.




''डोकं खाली ठेवणं'' म्हणजे अहंकार बाजूला ठेवणं, भावनांचं वादळ आवरणं आपलं मन स्थिर ठेवणं. विचलित न होणं.

''परिस्थितीचा आदर करणं'' म्हणजे विपरीत परिथतीतही मन शांत ठेवून त्या परिस्थितीला धैर्याने सामोरे जाणे. आणि संकटासमोर झुकून नाही, तर समजून उभं राहणं. अशा वेळी परिस्थिती समजून घेणं, उपलब्ध पर्याय तपासणं, स्वतःच्या ताकदीचं आणि मर्यादांचं भान ठेवणं आणि मग कृती करणंया गोष्टी महत्वाच्या ठरतात. हा प्रवास शांततेतून सजगतेकडे नेणारा असतो.

भारतीय क्रिकेटमध्ये असे विराट सारखे अनेक खेळाडू होऊन गेले, ज्यांनी फक्त खेळ नाही, तर आयुष्याचं तत्त्वज्ञानही शिकवलं. त्यांचं जीवन, त्यांचे विचार हे विराटच्या वाक्याचं मूर्तिमंत उदाहरण आहे. संयम आणि सातत्याचं प्रतीक असलेला राहुल द्रविड म्हणतो, ''यु डोन्ट प्ले फॉर द क्रॉवूड; यु प्ले फॉर द कंट्री.''

द्रविडने कधीही आवाज न करता, शांतपणे आपलं काम केलं. द वॉल या टोपणनावाला सार्थ ठरवत, त्याने प्रत्येक बॉलला आदरानं सामोरं जात संयम टिकवला. त्याचं फलंदाजीतील स्थैर्य हेच ''पुट युअर हेड डाउन...'' या विचाराचं उदाहरण ठरतं. **(क्रमशः)**



# दासबोध स्तवन



उज्वला धर्माधिकारी,
पुणे, मो. ७५८८२ ३५६४६

## शुध्दज्ञान निरूपण

ज्योतिर्मय साहित्य


मित्रांनो सर्व ज्ञानांचे शिखर म्हणजे आत्मज्ञान होय. जर तुमच्या वर सदुरूंचा आशिर्वादाचा हात असेल तर विनासायास प्राप्त होतो. सदुरूंचे वचन हेच आत्मज्ञानाच्या बाबतींत परमश्रेष्ठ समजावे. स्वतः वर गुरूंचा आशिर्वाद असल्यावर आत्मज्ञान होते त्यासाठी समर्थ सांगतात की, संस्कृत ग्रंथांत काय आहे ते आपण पाहिले नाही, मराठी ग्रंथ कधीच वाचले नाहीत, पण आपल्या ह्दयाच्या कप्प्यात सदुरूंचा वास कायम आहे. मग आपल्याला संस्कृत व प्राकृत ग्रंथांची गरज तरी काय आहे. माझ्या कडे स्वामींचा वरदहस्त कायमचा आहे. वेदांचा अभ्यास न करता किंवा श्रवणयाग न करता मला अगदी विनासायास प्रयत्नावाचून गोड सदुरूचा आशिर्वाद मिळाला आहे. मराठी ग्रंथतर श्रेष्ठ आहेच. पण त्यापेक्षा संस्कृत ग्रंथ जास्त श्रेष्ठ आहेत कारण संस्कृत भाषा ही ''देववाणी''

भाषा आहे. वेदांच्या पेक्षा श्रेष्ठ काहीच नाही. कारण वेदांचे सारें रहस्य वेदांतामध्ये प्रगट झालेले आहे.

अशा वेदांताच्या जो तात्पर्यार्थ आहे आणि जो अत्यंत खोल परमार्थ आहे . अतिशय खोल आणि अर्थगंभीर असे जर काही असेल तर तेसदुरूंचे वचन होय. त्यावचनाने निश्चित पणे समाधान मिळते. सदुरूचे वचन तोच खरा वेदांन्त तोच खरा सिध्दांत होय. ते खरे अनुभवलेले ज्ञान होय. सदुरूच्या चरणांशी सतत ''दास''म्हणून राहिले पाहिजे.

स्वतः जर परमात्म स्वरूप आहे आत्मज्ञानाचे सर्वांगाने वर्णनं केले. सदुरूशी अनन्य होऊन ते ज्ञान प्राप्त होते व पूर्ण समाधान मिळते. **(क्रमशः)**

# नाम घेण्याला काहीही आड येत नाही



श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज

ज्योतिर्मय साहित्य

आपण असे पाहू की, नामात प्रेम येण्याकरता एक एक सत्कर्म करीत राहणे सुलभ, की ते नामच विचाराने, सर्व संतांनी कळवळ्याने सांगितले आहे म्हणून, जरूर तर बळजबरीनेसुद्धा घेत राहणे, हे सुलभ ? समजा एक यंत्र आहे, त्यात पुष्कळ चक्र आहेत, आणि ते यंत्र चालू करण्याचा हेतू धरला आहे. आता एखाद्याने त्यांतले एखादेच चक्र चालू करू म्हटले तर ते चालू होईलच असा भरवसा नाही. पण त्या सर्व चक्रांचा संबंध असणारी कळ आपण दाबली, तर मात्र बिनतक्रार आणि अत्यंत अल्प प्रयासाने ते यंत्र सहज चालू करता येईल. त्याप्रमाणे, नाम ही कळ जर धरली तर सत्कर्मरूपी सर्व चक्र एकदम फिरू लागून आपले काम निश्चीतपणे आणि सुलभपणे होईल. म्हणून, हमखास आणि सहज रीतीने काम व्हावे अशी ज्याची इच्छा असेल त्याने कशाही रीतीने का होईना नाम घ्यायला लागावे. नाम घ्यायचे एकदा पक्के ठरविले म्हणजे काहीही आड येत नाही. व्यवहारात आपण पाहतोच की, एखादी गोष्ट समर्थनीय नसली तरी करायचा निश्चय केला की मनुष्य ती करतोच. मग नाम घेण्याचा जर निश्चय केला तर का नाही होणार ? काहीही केले तरी शेवटी नामाशिवाय गत्यंतर नाही; तर मग ते घेण्यात विलंब किंवा चालढकल करण्यात काय अर्थ आहे ? म्हणून, कोणत्याही तऱ्हेच्या शंका-कुशंका न घेता, कशाही तऱ्हेने पण नाम घेत राहावे हे उत्तम; म्हणजे विनाकारण काळ फुकट घालविला अशी पश्चात्तापाची पाळी येणार नाही.

जग हे अनेक मोहक वस्तूंनी भरले आहे. त्या वस्तू आपण पाहिल्या किंवा नुसत्या ऐकल्या तरी हव्याशा वाटतात, आणि त्या मिळविण्याचा आपण प्रयत्न करतो. म्हणून देवाजवळ आपण अशी प्रार्थना करावी की, ' देवा, मोहक वस्तू मला दाखवूच नकोस, कारण माझी इच्छा तिकडे जाईल आणि मी फसेन. देवा, माझे ज्यात खरे हित आहे तेच मला दिसो, तेच मी ऐको, त्याचेच मला स्मरण होवो, आणि त्याचीच मला गोडी लागो. '

प्रह्लाद, द्रौपदी यांसारख्या भक्तांनी देवाजवळ काय मागितले ? तेच आपण मागावे, आणि त्यांनी निष्ठा ठेवली तशीच आपणही ठेवावी. त्यांच्या ठिकाणी जसे वैराग्य होते, तसे आपल्या ठिकाणी आणण्याचा प्रयत्न करावा. प्रयत्न करीत असताना प्रथम चुका होतील, पण त्या झाल्या तर पश्चात्ताप व्हावा. ' देवा, मी फार दोषी, अपराधी आहे, मला क्षमा कर आणि तुझ्या कृपेला पात्र कर. ' पश्चात्ताप खराच झाला तर राम कृपा करीलच. मुखाने नाम घ्यावे, हाताने प्रपंचाचे काम करावे, आणि अंत:करणात समाधान ठेवावे.

१४. जो नाम घेऊ लागेल त्याचे मन बाहेर धावण्याचे हळूहळू कमी होते.

***

# ॥ संत महात्म्य ॥

लेखक - मधुकर बोरीकर
9403061886

## जगद्गुरु संतश्रेष्ठ तुकाराम महाराज यांचा अभंग

ज्योतिर्मय साहित्य

ज्यावेळेस ज्ञान प्राप्त झाल्यानंतर सविकल्प समाधीचा अभ्यास सुरू होतो. तो दृढ झाल्यावर निर्वीकल्प समाधीचा अभ्यास सुरू होतो. या अभ्यासा दरम्यान शून्या वस्थेचा अनुभव येतो. जाणीव तर आहे पण अवतीभवती काहीही नाही. केवळ अंधकार आहे, ही स्थिती येते. त्यावेळेस गुरु साधकाच्या मदतीसाठी साधकाच्या ह्दयात अनाहत नाद प्रकट करतात. या अनाहत नादाला तुकाराम महाराज महावाक्ये कानी बोंब झाली असे म्हणतात.

माणुस स्वाभाविकपणे विषय वस्तू व व्यक्ती याविषयी आत्मीयता बाळगून असतो. विषयाकडे वळलेले मन व बुद्धी हे माणसाला कर्म बंधनात अडकवीत असते. हा घट विरुद्ध दिशेने फिरवणे म्हणजे प्राण मन बुद्धी आत्म्याकडे वळवणे हे काम मी केले, म्हणून फिरविला घट आणि अहंकाराचा मटका मी चरणावर फोडला म्हणजेच अहंकार लिन केला असे महाराज म्हणतात.

*दिली तिळांजली कुळ नाम रूपाशी/ शरीर ज्याचे त्यासी समर्पिले/ तुका म्हणे रक्षा झाली आपोआप उजळला दीप गुरुकृपे//*

जेव्हा अहंकार लीन होतो. मन हे मृतप्राय होते. मी तू पणाची जाणीव संपते. मग कूळ, नाव, रूप, पद, भौतिक ऐश्वर्य, देहाचे सौंदर्य, इत्यादी गोष्टी कुठून असणार? ही स्थिती येण्याआधी पंच तत्वाची उपासना करावी लागते.

आपला देह हा पृथ्वी,जल आप वायू तेज या पंच तत्वांनी बनलेला असतो. या साधनेत या पंच तत्वाची आटणी करणे आवश्यक असते. सडणारे, कुजणारे, जरा, वृद्धत्व येणारे देहाचे परमाणु याला माइक परमाणु असेही म्हणतात. ते संपवून त्या ऐवजी अमाईक परमाणु बनवावे लागतात. या स्थितीला ज्ञानेश्वर महाराज देह होय सोनियाचा असे वर्णन करतात. या पंच तत्वाची आटणी करून शरीरातील ती ती तत्वे त्या त्या तत्त्वात विसर्जित केली म्हणून माइक परमाणु जळून त्याची राख झाली असे महाराज म्हणतात. आणि आत्म ज्ञानाचा दीप सदुरूच्या कृपेने उजळल्या गेला असे असे तुकाराम महाराज सांगतात.

बरेच लोक या स्थितीच्या अर्थ ,त्यांना पेलवेल या पद्धतीने सांगतात. त्यामुळे अशा सिद्ध पुरुषांचा, त्यांनी केलेल्या कठोर साधनेचा, आणि त्यांना प्राप्त झालेल्या दुर्मिळ उच्च स्थितीचा उपमर्द केल्याप्रमाणे होते. व तसेच तार्किक दृष्टीने व व्यावहारिक दृष्टिने पेलणारे अर्थ सर्वत्र प्रसृत झाल्यामुळे, मूळ अर्थ लोपल्या जातात.(अर्थे लोपली पुराणे, नाश केला शब्द ज्ञाने/विषय लोभी मने/साधने बुडविली) खरी साधना काय असते हे कोणासही माहिती सुद्धा होत नाही.

या स्थितीचा पूर्णत्वाने मला अनुभव नसला तरी माझ्या पाहण्यात असे अनुभव घेणारे साधक आलेले आहेत. त्यामुळे या स्थितीचा उल्लेख निसंधीग्ध पणे मी येथे केला आहे.

सर्वश्रेष्ठ संतांनी या कठोर साधना केल्या त्यामुळेच त्यांना हे उच्च पद प्राप्त झाले. आपणही त्याप्रमाणे सदुरूची कृपा असेल व कठोर साधना केली तर आपणही त्या स्थिती पर्यंत कदाचित जाऊ शकतो.

आपण या साधनेचा मार्ग अवलंबावा हाच कदाचीत हे अनुभव सांगण्या मागचा संतांचा मानस असेल ! जगदुरु तुकाराम महाराजांच्या चरणावर कोटी कोटी वंदन करून हा भाग इथे संपवू यात.

***

# ॥ निरूपण ॥



ह.भ.प. चंद्रहास शास्त्री सोनपेठकर

ज्योतिर्मय साहित्य

**प्राप्यमन्यत्तदाशेषं भुक्तिं मुक्तिं भगं तथा।**
**त्रिषु कालेषु सत्यं यद् भक्तेन प्राप्यतेऽधिकम्।।१७।।**

तेव्हा भुक्ति, मुक्ति, ऐश्वर्य असे काहीही प्राप्त करण्याजोगे शिल्लक राहत नाही. हे त्रिकाली सत्य आहे की, तुझा भक्त अधिक असे प्राप्त करतो.

**वत्सलता स्वभावस्तेऽनाथेषु च दया तथा।**
**चन्द्रहासप्रहारश्च मत्तेषु दुर्जनेषु च।।१८।।**

वात्सल्य हा तुझा स्वभाव आहे. अनाथावर तू दया करतेस. दुर्जन आणि उन्मत्त लोकांवर खड्ग प्रहार करतेस.

**तस्माद्ध्यायेत् सदा दुर्गां स्वस्तिं स्वाहां स्वधामपि।**
**श्रीचरणाम्बुजध्यानं सर्वानन्दप्रदं सुखम्।।१९।।**

म्हणून माणसाने नेहमी स्वस्ति, स्वाहा, स्वधा स्वरूप अशा दुर्गेचे ध्यान करावे. श्रीचरणकमलाचे ध्यान तर सर्व आनंदप्रद असे सुख आहे.

अथ श्रीशिववन्दनम्।

**नमः शिवाय जप्त्वा त्वं सहजं प्राप्स्यसे सुखम्।**
**मा विस्मर महादेवं शैलजावल्लभं शिवम्।।२०।।**

तू नमः शिवाय असा जप करून सहज सुख प्राप्त करशील. शैलजावल्लभ अशाशिवशंकरास तू विसरू नकोस.

# ॥ श्री राम कथा ॥





वक्ते : आदरणीय श्री चैतन्य महाराज देगलूरकर

ज्योतिर्मय साहित्य

कोणाचा दृष्टांत...

विभीषणहाने तुमच्या शिवाय मी कोणास शरण जावे?

भगवान म्हणतात ना मला शरण आला त्याचे रक्षण मी करतो.कारण जगात शरन्य केवळ मी आहे.स्वतःला वेगळे न समजता मला एकरूप होणे हे शरण होय.

कथा ऐकता ऐकता धावते संकलन
मधुकर बोरीकर, 9403061886

बिभीषण आला.चरणावर मस्तक ठेवले सर्व लोकात तुम्हीच एकमेव शरन्य असेल. मी सर्व सोडून आला.मी लंकेचा परित्याग केला.मी मित्रा सोडले धन सोडले.असा निःसंग होऊन आलो.सर्वांना हे आवडले. रामानी त्यास तुला रावण वधानंतर लंकेच्या गादीवर बसविण्याचे वचन दिले.

लक्ष्मण म्हणे तुम्ही असे वचन लगेच द्यायला नको म्हणे. कारण समाज रावण शरण आला तर तुम्ही त्यास मारू शकणार नाही मग याला गादीवर कसे बसविणार?

राम म्हणाले असे झालेच तर मी अयोध्येचे राज्य बिभीषणास देईल.

पुन्हा एकदा सामोपचाराचा प्रयत्न केला पण उपयोग झाला नाही.

समुद्रांनी ३ दिवस वाट पाहूनही दिली नाही शेवटी धनुष्य वर बाण चढविला की घाबरून सह कुटुंब प्रकट झाला. तुम्ही सत्र काढल्या शिवाय प्रकट झाला नाहीत. समुद्र म्हणे मी तुमचा पूर्वज आहे तुम्ही माझे वंशज आहात पण खरे सांगतो तुमची मला लाज वाटते, तुमचे तोंड पाहण्याची लाज वाटते.

**(क्रमशः)**




# बेलफळांचा वापर आयुर्वेदिक औषधांमध्ये भरपूर केला जातो.

ज्योतिर्मय साहित्य

तसेच या झाडाची पाने, फुले, झाडाची साल व खोडाचा गाभा याचाही आयुर्वेदिक औषधी म्हणून उपयोग करता येतो. बेलाचे झाड हे वातावरण शुद्धीकरणाचे कार्य करते.

बेलाची पाने रक्तातील साखर नियंत्रित करण्यासाठी उपयुक्त मानली जातात. यामध्ये रेचक गुणधर्म मोठ्या प्रमाणात आढळतात. जे पुरेसे इन्सुलिन तयार करण्यात मदत करतात. त्यामुळे रक्तातील साखर नियंत्रित राहते. आयुर्वेदाचार्यांशी सल्लामसलत केल्यानंतर ते सेवन केले जाऊ शकते.

पोट साफ होते

बद्धकोष्ठतेची समस्या असल्यास वेलाची पाने खावीत. बेलची पाने थोडे मीठ आणि मिरपूड चघळल्याने बद्धकोष्ठतेपासून आराम मिळतो. ही पाने आतड्यांमधून विषारी पदार्थ काढून टाकण्यास मदत करतात, असेही म्हटंले जाते.

पचनक्रिया चांगली राहते

बेल पोट साफ करण्याचे काम करते. यात रेचक गुणधर्म आहेत जे पाचन तंत्र मजबूत करतात. तुम्हाला पचनाच्या समस्या असतील तर बेल किंवा बेलची पाने खाऊ शकता. परंतु ती प्रमाणात खाणे गरजेतचे आहे.

मधुमेहाच्या रुग्णांसाठी

बेल अतिशय फायदेशीर आहे. दिवसातून दोन वेळा बेलाच्या पानांचा रस पिल्यास मधुमेहापासून मुक्तता मिळविणे शक्य होऊ शकते. शरीराच्या वजनानुसार बेल फळाचा अर्क घेतल्यास त्याचा परिणाम दिसून येतो. कारण कौमारीन नावाचा घटक बेल फळामध्ये असल्यामुळे इन्सुलिन निर्माण करण्यासाठी बीटा पेशीला उत्तेजित करतो.

अतिसार विरोधी

उन्हाळ्याच्या दिवसात अतिसार ही समस्या आता अधिकांश लोकांमध्ये दिसून येते. अलीकडे या रुग्णांचे प्रमाण वाढीस लागले आहेत. या परिस्थितीत उलट्या, हगवण, मळमळ वाटू लागते. बेलाच्या पाण्यात साखर मिसळून प्यायल्यास याचे लाभ दिसून येतात. किंवा कच्चे फळे खाल्यास अतिसार नियंत्रणामध्ये येतो. अर्धे पिकलेली फळ हे सर्वोत्तम मानले जाते परंतु संपूर्ण पिकलेली फळे किंवा अगदी फळाचा चूर्ण परिणामकारक परिणाम दर्शवितो.

रक्तक्षयविरोधी

बदलत्या जीवनशैलीत अनेकांना रक्ताच्या कमरतेचे लक्षण दिसून येतात. अशा परिस्थितीत वाळलेल्या बेलाच्या गराचा चूर्ण तयार करा. तो चुर्ण गरम दुधात रोज एक चमचा टाका आणि प्या. यामळे शरीरात नवीन रक्त तयार होण्यास सुरुवात होते.

ऊन लागल्यास

जागतीक तापमानवाढीमुळे दरवर्षी उन्हाळ्यात तापमानचा पार वाढतो. दरवर्षीचा हा अनुभव असल्याने अनेकांना ऊन लागते. हा त्रास सुरू झाल्यास बेलाच्या ताज्या पानांना कुटून मेहंदीप्रमाणे तळपायावर लावावे. अशा वेळी बेलाचा शरबत प्यायल्यास तत्काळ आराम मिळतो.

बेल फळाच्या लगद्यामध्ये स्टिरॉइड्स, कूमारिन्स, फ्लॅनोनोयड्स, टरपेनॉईड, फिनोलॉलिक संयुगे, लिग्निन, इनुलीन, आणि अन्य एंटिऑक्सिडेंट जी आपल्याला जुनाट रोगांपासून वाचवू शकतात. याव्यतिरिक्त, त्यात प्रथिने, कर्बोदके, खनिजे (कॅल्शियम, फॉस्फरस, पोटॅशियम, लोह) आणि जीवनसत्वे (विट ए, विट बी, विट सी आणि रिबोफ्लेव्हिन) यांचा समावेश आहे. ॲल्कॉइड, कार्डियाक ग्लायकोसाइड आणि फ्लॅनोनोयड्स इत्यादीचा उत्तम स्त्रोत आहे. बेलफळ हे स्थानिक पारंपारिक औषधांसाठी वापरले जाणाऱ्या महत्वाच्या झाडांपैकी एक आहे.

संकलन -
डॉ. प्रमोद ढेरे (निसर्ग उपचार तज्ञ)
पिंपरी-चिंचवड, पुणे.
आरोग्यविषयक व्याख्याते व लेखक
संपर्क - ९२ ७१ ६६९ ६६९

# आरसा सांगे गुपित..






**ज्योतिर्मय साहित्य**

आरसा.. आपले प्रतिबिंब दाखविणारा.. पहिला आरसा आपल्या प्रत्येकाला आई, वडिलांच्या, आजीच्या डोळ्यात दिसतो. हे पाहिले प्रतिबिंब खूप लोभस असते. प्रेम, जिव्हाळ्यानी भरलेले.. वय वाढेल तसे पायातल्या घुंगुर ताला बरोबर हर्षाचा ही ताल बदलत जातो. आपले अवखळ रूप, बालिश चाळे, कुठेतरी बाल्य आणि तारुण्याच्या उंबरठ्यावर होणाऱ्या बदलांची ओढ लावणारे पहिले गुपित आरसाच आपल्याला सांगतो..

आपल्या तारुण्यातले मोहरलेले रूप अवघा निसर्गच दाखवत असतो. अतिशय उन्मादी आपणच आपल्या आनंदी विश्वात रमण्याचे हे दिवस.

पाण्यात पाहती का माझे मलाच डोळे प्रतिबिंब हे कुणाचे लावण्यही निराळे.. असे उगीचच वाटू लागते, कारण आसपासच्या चेहऱ्यावर कौतुक दिसू लागलेले असते.. अशावेळी

अंदाज आरशाचा,वाटे खरा असावा बहुतेक माणसाचा, तो चेहरा असावा ही इलाही जमादार यांची गझल आठवू लागते..

हळूहळू जीवनाचा प्रवाह वाहत राहतो, अनेक चांगल्या, वाईट घटनांनी आपले विचार, अनुभव विश्व समृद्ध होऊ लागते. आपलेच नवरीचे रूप न्याहाळणारा आरसा, आई होण्याची चाहूल लागताच सृजनाच्या ओढीने प्रसन्न दिसणारा आरसा..आई झाल्यावर मुलांच्या डोळ्यात जग दाखविणारा आरसा.. अशी आपली काही आपली खास गुपिते जपणारा आरसा जीवलग होतो..

पण तो ज्या वेळी आपण चिडतो, रूसतो, निराश दुःखी असतो त्या वेळी आरसा आपला खरा मित्र वाटतो..कारण तो कधी माणसासारखा मुखवटा बदलत नाही.

आता आपल्या डोळ्यातला आरसा जास्त प्रगल्भ होऊ लागतो. मृगजळ, वास्तव यातील कधी कधी फरक क्वचित तरी त्याला ओळखता येऊ लागतो. आसपासच्या डोळ्यातील आरशामध्ये नितळपणात कौतुक ओळखता येते, तसेच पडलेले चरे, काच आणि गढूळ पण आहे ओळखता येऊ लागतो..

हलके हलके हे सगळे आरसे फिकट होऊ लागतात.आणि आपल्या नकळत आपण आपल्या प्रिय देवाच्या मूर्तीत आपले प्रतिबिंब शोधू लागतो.. हा आरसा मात्र नेहमी आपले प्रतिबिंब उजळवत ठेवतो.. अगदी देवघरातील मंद तेवणाऱ्या नंदादीपासारखे..

# देव कोठे असतो ?






**ज्योतिर्मय साहित्य**

एक अत्यंत गरीब व अनाथ मुलगा रानावनात अनवाणी फिरून रोज वेगवेगळ्या रंगाची फुले गोळा करून विठ्ठल मंदिराच्या आसपास विकत असे.

त्यामुळे त्याला आपली कशी तरी दोन वेळची भाकरी खायला मिळत असे. कुणी तरी दिलेला एकच ड्रेस तो रोज घालत असे. रात्री झोपडीत गेल्यावर फक्त साध्या एका टॉवेलवर राहून तो ड्रेस स्वच्छ धुवून वाळायला टाकत असे आणि सकाळी पुन्हा तोच घालून फुले शोधून तोडून मंदिराकडे विकायला जात असे. हाच रस्ता मंदिराकडे जाणारा रस्ता होता.

शिक्षकी पेशातून सेवानिवृत्त झालेले पांडुरंग काका रोज त्या रस्त्याने जात असत पुढे विठ्ठल मंदिरात ते गेल्यावर त्याच मुलाकडून थोडे फुले विकत घेऊन विठ्ठल चरणी अर्पण करत असत.

एके दिवशी ते संध्याकाळी उशिरा मंदिरात गेले. तेंव्हा तो मुलगा तेथे संध्याकाळी नव्हता. विठ्ठलाचे दर्शन घेऊन घरी परत येताना त्यांना रस्त्यात पावसाने गाठले. तेंव्हा ते नेमके त्याच छोट्या झोपडीकडे वळले.

त्यांनी बाहेर एका दगडावर तो मुलगा रोज घालत असलेले कपडे वाळू घातलेले पाहिले. त्यांनी आत डोकावून पाहता तोच मुलगा टॉवेलवर गाढ झोपलेला पाहिला.

तो मुलगा रोज पायपिट करून थकत असे व संध्याकाळी जमिनीवर पडताच झोपी जायी. गारवा असलेल्या वेळी त्याच्या अंगावर फक्त टॉवेल होता.. पांडुरंग काकांना वाईट वाटले. दुसऱ्या दिवशी मुद्दाम ते संध्याकाळीच तेथे आले. पुन्हा तेच कपडे तेथे वाळू घातलेले आणि मुलगा झोपलेला त्यांनी पाहिला. त्यांनी स्वतः आदल्या दिवशी त्या कपड्याचे हाताने अंदाजे माप घेतले होते आणि त्या मुलाचे चिखलात उमटलेल्या पावलांचे ठसे याचेही अंदाजे माप घेतले होते आणि त्याच मापाचे कपडे आणि चप्पल व पांघरून विकत आणले होते. त्यांनी हळूच, त्या झोपलेल्या मुलाच्या अंगावर पांघरून टाकले, नवीन आणलेले कपडे त्याच्या झोपडीच्या दाराशी ठेवले आणि तेथेच नवीन आणलेली चप्पल ठेवली. पाऊस वाढला म्हणून ते. लगबगीने घरी निघुन गेले.

तिसऱ्या दिवशी सकाळी तो उठताच त्याला आपल्या अंगावर पांघरून दिसले, दारात नवीन ड्रेस आणि चप्पल दिसली, तो खूप आनंदी झाला. त्याने पांघरून घडी करून ठेवले, सर्व आटोपून नवीन कपडे घातले, चप्पल घातली आणि पुन्हा फुले शोधून आणून मंदिराकडे विकण्यासाठी गेला. पांडुरंग काका तेथे आज मुद्दाम लवकर आले होते. त्या मुलाला पाहून ते खुश झाले आणि त्याच्या कडून फुले घेताना हसत विचारले, आज नवीन ड्रेस आणि पायात चप्पल घालून आलास? तेंव्हा तो मुलगा म्हणाला, काका सारं काही पांडुरंगाने दिलं.

तुम्ही मला मागे विचारले होते ना ? देव कुठे असतो? त्याच उत्तर मी आता सांगतो. देव माणसात असतो. आता देव माझ्या समोर उभा आहे. तो तुम्हीच, आणि तो मुलगा पांडुरंग काकांना नतमस्तक झाला. त्याच्या डोळ्यातून पडणारे अश्रूंचे थेंब काकांची पाय धुवून काढत होती, एखादा अभिषेक केल्यासारखी, तेंव्हा काकाना गहिवरून आले त्यांनी त्या मुलाला जवळ घेऊन विचारले, तुला हे कपडे, चप्पल आणि पांघरून मीच दिले हे कसे कळले?

तेव्हा तो मुलगा हसत म्हणाला माझ्या झोपडीकडे, चिखलात उमटलेले पायाचे ठसे आणि आता या मंदिरासमोर चिखलात उमटलेले तुमचे पायाचे ठसे अगदी एकसारखे, हुबेहूब आहेत. मग देव पांडुरंगच माझ्या. झोपडीकडे आले होते मला सारं काही द्यायला. हो ना? आणि काकांच्या डोळ्यातून ही अश्रू तरळले. बोला विठ्ठल विठ्ठल जय हरी

# गणेशोत्सवरूपी लोकोत्सवातून एकोपा साधला जातो : डॉ. पठाडे

## श्रमिक वृत्तपत्र वक्रिता संघटनेच्या श्रीं ची आरती उत्साहात



**ज्योतिर्मय साहित्य**

**छत्रपती संभाजीनगर** – सर्व जाती-धर्मांतील गणेशभक्तांचा लोकोत्सव म्हणजे गणेशोत्सव. यात विविध सामाजिक आणि मनोरंजक कार्यक्रमांतून सामाजिक एकोपा साधला जात असल्यामुळे हा सण अधिक उत्साहाचा बनतो. लोकनाट्य-तमाशा, भजन-कीर्तन, जागरण-गोंधळ, वासुदेव आदी लोकरंगभूमीचे उपासकही प्रथम वघ्निहर्ता श्रीगणेशाला वंदन करून कार्यक्रमाला सुरुवात करताता, असे प्रतिपादन लोकसाहत्यिाचे अभ्यासक डॉ. शेषराव पठाडे यांनी गुरूवारी, ४ सप्टेंबर रोजी हर्सूल येथे केले. प्रताप शिरसाठ, संतोष सावंत, श्री. पाडे, श्री. बरबडे यांची प्रमुख उपस्थिती होती.

हर्सूलमधील सोनार कॉलनीत महाराष्ट्र राज्य श्रमिक वृत्तपत्र वक्रिता संघटनेच्या श्रीराजा गणरायाच्या आरतीप्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून डॉ. पठाडे बोलत होते. आरतीनंतर शाहीर पठ्ठे बापुराव कुलकर्णी यांच्या आधी गणाला रणी आणावा हो। नाही तर रंग पुन्हा सुना सुना या गणाने आपल्या व्याख्यानाला सुरुवात करून डॉ. पठाडे म्हणाले, श्रीं चे अनंत चतुर्थीला वाजत-गाजत हर्षोल्हासात स्वागत होते आणि अनंत चतुर्दशीला भव्य मिरवणुकीने विसर्जन हे चैतन्य आणि मांगल्याचे प्रतीक मानले जाते. या सणाला घराघरांत सुख-समृद्धी आणि शांती प्रस्थापित होते. श्रीगणेश १४ वद्यिा आणि ६४ कलांची देवता असून, लोकमान्य टिळकांनी सार्वजनिक गणेशोत्सवाची सुरुवात केल्यामुळे हा सण अधिकाधिक लोकांपर्यंत पोहोचून समाजात एकात्मतेची भावना नर्मािण झाली. शुक्रवारी, ५ रोजी आयोजित भंडारा महाप्रसादाचा हजारो भक्तांनी लाभ घेतला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रकाश वाघ यांनी केले. मंडळाचे अध्यक्ष शिरीष जोशी, मनोज बोऱ्हाडे, आकाश खोले, प्रा. शिवाजी ढेपले, अकुश काझे, राम बुऱ्हाडे, मयूर औताडे, पोफळे काका, जय बुऱ्हाडे, गणेश दाभाडे, धीरज औताडे, ओम बुऱ्हाडे, वष्णिू कावळे, वष्णिू ढाकणे, दिलीप जगताप, रामकृष्ण राऊत, आजीनाथ बांगर, राजू गायकवाड, पुंडलिक भोसले आदींनी गणेशोत्सव यशस्वी करण्यासाठी परश्रिम घेतले.

# अत्याधुनिक इलेक्ट्रीकल लॅबचे उद्घाटन सोहळा




**ज्योतिर्मय साहित्य**

**पुणे** – ज्ञानदा प्रतिष्ठान संचलित ज्ञानदा तंत्रशिक्षण केंद्र येथे अत्याधुनिक इलेक्ट्रीकल लॅबचे उद्घाटन सोहळा आज गुरुवार, दिनांक ४ सप्टेंबर २०२५ रोजी थाटात संपन्न झाला. या कार्यक्रमाचे उद्घाटन संस्थेचे अध्यक्ष उदयन पाठक यांच्या हस्ते झाले. प्रमुख अतिथी म्हणून सेवा सहयोगच्या धनश्री देशपांडे यांची उपस्थिती होती.

लॅबच्या उद्घाटनानंतर विवेक जोशी आणि मान्यवरांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधत तंत्रशिक्षण क्षेत्रातील संधी व भविष्यातील प्रगतीविषयी मार्गदर्शन केले. नवीन शिक्षण पद्धतीतील अभ्यासक्रमा अंतर्गत हे केंद्र विकसित करण्यात आले आहे. लॅबमुळे विद्यार्थ्यांना प्रात्यक्षिक ज्ञान मिळून रोजगाराभिमुख शिक्षणाची दिशा मिळेल, असे समाधान व्यक्त करण्यात आले तसेच अत्यंत माफक फी मध्ये वरील इलेक्ट्रीकल प्रशिक्षण देण्यात येणार असल्याचे संस्थेचे कार्यवाह मंदार शेंडे यांनी जाहीर केले. ह्या प्रशिक्षणाचा लाभ संस्थेतील तसेच परिसरातील अन्य शाळेतील विद्यार्थांनी/ नागरिकांनी घ्यावा असे आवाहन करण्यात आले.


विनायक जोशी, मंदार शेंडे, सत्यजित चितळे, माणिक कुलकर्णी, बापू गोहाड तसेच मुख्याध्यापिका स्वाती कुलकर्णी, प्रशिक्षक कडूसकर इ.यांची मुख्य उपस्थिती होती. या वेळी ज्ञानदा प्रतिष्ठानचे पदाधिकारी, शिक्षक, कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.









# आधी वंदू तूज मोरया...

## श्रीसिध्दीविनायक गणपतीदेवास प्रार्थनापत्र

**ज्योतिर्मय साहित्य**

ॐकारस्वरुपा! अनंत विश्वाच्या ब्रह्मांडनायका हे गणपतीदेवा, सिध्दीविनायका,वरदविनायका, मयुरेश्वरदेवा, हे गिरिजात्मकदेवा, महागणपती देवा, हे बल्लाळेश्वरदेवा, हे एकदंतदेवा, हे गौरीसुतनंदना, हे लंबोदरदेवा, हे भालचंद्रदेवा, हे महेश्वरदेवा, हे चिंतामणीदेवा, हे मंगलमूर्ती,

हे गजाननदेवा, हे गजकर्णदेवा,हे लंबकर्णदेवा,

हे एकाक्षरदेवा, हे विघ्नेश्वरदेवा, हे प्रथमेशदेवा, हे महामंगलमुर्तीदेवा, हे अविघ्नदेवा, हे मोरया देवा, हे बुध्दीनाथदेवा, हे गणपतीबाप्पा देवा, हे

अमित देवा, हे गणाध्यक्षदेवा, हे वक्रतुंडदेवा, हे सुखकर्ता, दू:खहर्तादेवा, हे अनाथांच्या नाथा तुज नमो! तुज नमो! तुज नमो! तव चरणी मम साष्टांग दंडवत! कोटी नमन देवा! हे वरदविनायकदेवा या कलियुगात एकोणिसाव्या शतकापर्यंत पृथ्वीतलावर निसर्गाचे संतुलन व पर्यावरणाचे संतुलन अगदी व्यवस्थित होते. पण, या विसाव्या शतकाच्या सहाव्या दशकानंतर निसर्गाच्या आणि पर्यावरणाच्या बदलास सुरुवात झाली. नंतर, विसाव्या शतकाच्या अखेरच्या दोन दशकात तर फार मोठ्या प्रमाणात निसर्ग आणि पर्यावरण यात बदल होऊ लागले. त्याचा परिणाम, निसर्गाच्या ऋतुचक्रावर व पर्यावरण संतुलनावर होण्यास सुरुवात झाली. हे सिध्दीगणेशदेवा, पण त्याचा परिणाम सर्वसामान्य गोरगरीब जनतेच्या कौटुंबिक जीवनावर व सामाजिक जीवनावर होऊ लागला. त्यामुळे, सर्वसामान्य जनतेला जीवन जगणे कठीण होऊ लागले. हे गणाधिपतीदेवा! आत्तापर्यंत सर्व माणसांना आणि तुझ्या सर्व भक्तगणांना सर्व धार्मिक, सामाजिक, सांस्कृतिक सण समारंभ उत्तमरित्या साजरे करता येत असत. पण, आता या एकविसाव्या शतकात मात्र धार्मिक, सांस्कृतिक, सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक तसेच, कौटुंबिक परिस्थिती फार म्हणजे फारच बदललेली आहे. या आधीच्या शतकात लोक तुझे आणि इतर देवदेवतांचे सण मोठ्या उत्साहात, सात्विकतेने छान कलाविष्काराने आनंदाने साजरे करीत असत. हा आनंद प्रत्येकाच्या चेहऱ्यावर दिसून येत असे. त्यामुळे, या सणांची सर्वजण उत्सुकतेने वाट पाहत असत. पण, हे गणेशदेवा, विघ्नविनाशकदेवा बल्लाळेश्वर देवा आता या एकविसाव्या शतकात सणासमारंभाची व लोकांच्या स्वभावाची परिस्थिती फारच बदललेली आहे. एकविसाव्या शतकाच्या पहिल्या दशकात ध्वनिप्रदूषण, वायुप्रदूषण, जलप्रदूषण आणि अन्नधान्य भेसळ प्रदूषण यांचे प्रमाण पन्नास टक्क्यांपर्यंत होते. तेच प्रमाण दूस-या दशकात सत्तर टक्यांपर्यंत वाढले. विशेष म्हणजे, या दशकात अत्यंत जीवनावश्यक असणा-या जीवनरक्षक औषंधामध्येही भेसळ होण्यास सुरुवात झाली. हे सिध्दीगणेशदेवा, एकविसाव्या शतकाच्या तिसऱ्या दशकात आता तर उपरोल्लेखित सर्व प्रकारच्या प्रदूषणांचं प्रमाण हे नव्वद टक्यांपर्यंत पोहोचलं आहे. त्यातल्यात्यात कहर म्हणजे वायूप्रदूषण आणि ध्वनिप्रदूषणाने तर शंभरी पार केली आहे. अशी ही विघातक अत्यंत निचवृत्तीची, दूष्कर्मी कृत्ये एकविसाव्या शतकाच्या या तिसऱ्या दशकातील काही असूरांपेक्षाही घातक अशा अत्यंत क्रूर अशा माणसांनी केली आहेत व करीत आहेत. तसेच, दिवसेंदिवस अशा दूष्टप्रवृत्तीच्या लोकांची संख्या दिवसेंदिवस वाढतच चालली आहे. त्यामुळे, तुझ्या भक्तांना व सर्वसामान्य सर्व जनतेला जीवन जगणे खूप कठीण होत चालले आहे. यापूर्वीच्या इतर सर्व युगात हे मंगलमूर्तीदेवा, हे विघ्नहर्तादेवा तू अनेक दूष्ट, क्रूर राक्षसांना ठार करुन सर्व भक्तांचे रक्षण करुन त्यांचे जीवन सुखानंदाचे केले आहेस. तसेच, धर्माचेही रक्षण केले आहेस. त्यासाठीच हे गणराया, गणाध्यक्षदेवा तुझ्या चरणी प्रार्थनापत्र ठेवीत आहे. हे बुध्दीनाथदेवा, या कलियुगातील एकविसाव्या शतकातील दूष्ट, क्रूर व पापी माणसांची बुध्दी भ्रष्ट झाली आहे. त्यामुळे, हे दूराचारी, अधम लोक राक्षसांपेक्षाही अधिक क्रूरपणे वागून राक्षसाला ही



लाज वाटेल अशी अत्यंत घृणास्पद, अत्यंत नीच कृत्ये करीत आहेत. राक्षस तरी दहा वर्षे, पंधरा तपश्चर्या करुन ब्रह्मदेवाकडून, महादेवाकडून वरदान प्राप्त करीत असत. नंतर ते राक्षस त्या वरदानाचा अघोरी कृत्यासाठी गैरमार्गाचा वापर करुन लोकांना,भक्तांना जास्त त्रास देवू लागले की, ब्रह्मदेव किंवा महादेव त्यांना ठार मारुन सर्व लोकांना व भक्तांना सुखी जीवन प्राप्त करुन देत असत. लोकांनी आचार विचारांचे, नीती नियमांचे सर्व नियम पायदळी तुडविले आहेत. मनमानी पद्धतीने, बेजबाबदारपणे, निर्दयीपणे, माथेफिरू सारखे वागणारे बरेच दूष्ट, आणि राक्षसांहूनही भयंकर क्रूर अशी माणसे कोणत्याही कुटुंबातील लोकांना आणि सार्वजनिक जीवनातही अघोरीपणे चोरी, दरोडे, महिलांवर अत्याचार, बलात्कार यासारखे गंभीर गुन्हे करीत आहेत. तसेच, क्रूरपणे मुलं, मुली, तरुण, तरुणी, वृध्द लोकांची हत्या करीत आहेत. अशा लोकांचे प्रमाण तसेच, त्यांच्या गुन्ह्यांचेही प्रमाण वाढतंच चाललं आहे. अशा लोकांवर कडक कारवाई होऊन त्यांना कडक शिक्षा होत नाही असेच सध्याचे चित्र दिसून येत आहे. अशा लोकांवर कायद्याचा किंवा सरकारचा अंकुश राहिलेला दिसून येत नाही. कारण महिलांवरील अत्याचाराचे व चोरी, खून दरोडे, अंमली पदार्थांची तस्करी यांचे प्रमाणही वरचेवर वाढतंच चालले आहे. सामान्य लोकांना

कुणीच वाली राहिलेला नाही असेच सध्याचे जनजीवनाचे चित्र आहे. नोकरी, व्यवसायासाठी

स्वत:च्या कामासाठी बाहेर पडणाऱ्या माणसांना, बायकांना कामावरून संध्याकाळी घरी परत येवू का नाही याची शाश्वती राहिलेली नाही. कारण रस्त्यावरुन गाडी चालवताना कोणत्याही नियमांचे पालन न करणारे काही वाहनधारक बेफामपणे, बेभान होऊन अतिवेगाने वाहने चालवणारे बेजबाबदार, उर्मट वाहनधारक अतिवेगाने वाहने चालवून निष्पाप, सामान्य लोकांचे प्राण घेत आहेत. अशा गरीब लोकांचे संसार उद्धवस्त होत आहेत. अशा दूष्ट, कृतघ्न लोकांचे प्रमाणही खूप वाढत चालले आहे. तसेच, तीन दशकांपासून सर्व प्रकारच्या प्रदूषणाचे प्रमाण खूप वाढत चालले आहे. त्यातल्यात्यात एकविसाव्या शतकाच्या तिसऱ्या दशकात तर सर्व प्रकारच्या प्रदूषणाने

कहरच केला आहे. जगातील सर्व देशांतील तसेच,भारत देशातील व विशेषतः महाराष्ट्रातील बव्हंशी दूष्ट, क्रूर, भ्रष्टाचारी, कृतघ्न व पापी माणसांनी जंगलांचा, मोठमोठ्या वृक्षराजींचा विनाश केला आहे. व त्यांच्या दूष्कृत्यांचं हे प्रमाण वाढतंच चाललं आहे. त्यामुळे, पृथ्वीचं पर्यावरण संतुलन खूप अस्थिर झालेलं आहे. तसेच, निसर्गसृष्टीतील ऋतूचक्रावरही त्याचा फार मोठा परिणाम झाला आहे व होत आहे. त्यामुळे, पावसाळा, उन्हाळा व हिवाळा या ऋतूंमध्येही खूप बदल झाला आहे. शासन व त्यांच्या शासकिय यंत्रणाही या दूष्टांना क्रूर अशा राक्षसीकृत्य करणा-या गुन्हेगारी माणसांना कडक शिक्षा करीत नाही. त्यामुळे, सामान्य जनांना, न्याय मिळणे खूप कठीण झाले आहे. हे विघ्नविनाशकदेवा, सुखकर्ता, दु:खहर्ता गणपतीदेवा तुझ्या भक्तांच्या जीवनाच्या सुखशांतीसाठी तूचं आता सर्व भक्तांवर कृपा कर आणि दूष्ट, क्रूर अशी दूष्कृत्ये करणा-या राक्षसी माणसांना चांगलं वागण्याची त्यांना सद्बुद्धी दे, आणि तरीही त्यांची दूष्कृत्ये जर अशीच चालू राहिली तर अशा क्रूर,राक्षसी माणसांचा विनाश कर. कारण, हे सिध्दीविनायक देवा तूच म्हटलेलं आहेस की, प्राण्यांच्या साधूनाम। विनाशायचं दूष्कृताम! संभवामी युगे युगे! म्हणूनंच तुझ्या चरणी सर्व भक्तांच्या सुखानंदासाठी साष्टांग दंडवत आहे.

एकदंताय विद्महे! वक्रतुंडाय धीमहि। तन्नोदंती प्रचोदयात। गणपती बाप्पा मोरया! मंगलमुर्ती मोरया!




■ लेख व काव्यरचना
मधुकर निलेगावकर, पुणे
९४२१३७५६९१

***

## !! गणेश महात्म्य. !!

**ज्योतिर्मय साहित्य**

गणांचा ईश म्हणजे गणेश. जो समूह मनांचा देव आहे. म्हणूनच कोणत्याही कार्यारंभी श्री गणेशाचे पूजन करण्याची परंपरा आपणाकडे आजही कायम आहे. मानवी मनाच्या भावपूर्ण आशा आकांक्षांना, मनातील भावभावनांना, श्रद्धातून निर्माण झालेला हा पहिला अंकुर आहे. अरुपाला पडलेले रूप रसगंधाचे ''प्रथमेश'' हे पहाटे पडलेले सुंदर स्वप्न आहे. विहंगाच्या कोवळ्या सुमधुर कुंजण्याच्या वेळी, जात्यावर दळता दळता म्हणताना लोक कवयित्रीने आपल्या पहिल्या ओळी ओवीचे फुल भक्तिभामाने गणेशाच्या चरणी अर्पण केलेले आहे. गणपती हा बुद्धीचा दायक व सिद्धीचा नायक आणि विघ्नांचा विनायक आहे. अनेक कवी लेखक कलावंतांनाही गणेश हा जीवनातील सत्य शिव सुंदरतेचे अधिष्ठान असल्याचं आपल्या काव्यातून ज्याचा सुंदर वर्णन केलेला आहे त्यामुळेच गणेश उपासनेला खूप मोठे महत्त्व प्राप्त झालेलं आहे.



पुराण काळापासून गणेशाची उपासना आपल्या सण उत्सव मंगल कार्यामधून प्रथमता करण्याची परंपरा आजही सुरू आहे. मराठी मनामनात गणेश देवतेला खूप मोठे मानाचे स्थान दिलेलं आहे. म्हणूनच महादेवाची आराधना भक्ती भावाने करणाऱ्या मराठी भाविकांनी त्याच्या पुत्रास श्री गणेशास मस्तकी धारण करत उत्सवाच्या निमित्ताने गणेशमय होऊन जातात. साऱ्या महाराष्ट्रातील घराघरामधून गणेश विराजमान झालेला नी त्याच्या हृदय सिंहासनावर भक्ती भावाने आरुढ झालेला आहे. त्यामधून हजारो भक्तांनी अत्यंत भक्तिभावाने गावागावा मधून अनेक देवर गणेश देवतांचे मंदिरे देखील उभी केलेली आपणास पहावयास मिळतात.



सुधीर कोर्टीकर
मो.९७६५५५३३१२
छत्रपती संभाजीनगर

गणेश पुराण मुद्गल पुराणातूनही गणेशाच्या पराक्रमाच्या कथा खूप सुंदर शब्दातून सांगितलेले आहेत त्याचप्रमाणे या गजाननाच्या प्रत्येक स्थानाचे महत्त्व सुरेख शब्दातून विशद केलेलं आहे सर्वात आनंदाची गोष्ट गणपतीची ही तीर्थस्थाना, अष्टविनायक मंदिर महाराष्ट्र मध्येच आहेत व्यास ऋषीने १८ मूळ पुराणाची रचना संस्कृतमध्ये केलेली आहे त्यापैकी एक असणारे गणेश पुराण व्यासाचे शिष्य ऋषी यांनी हे पुरण शौनक ऋषी व त्यांच्या शिष्यांना सांगितले नंतर हे गणेश पुराण त्यांच्या माध्यमातून आपणा सर्वांना पोहोच पोहोचले प्रत्येक गणेश भक्ताने गणेश जयंती किंवा संकट चतुर्थी गणेशाची मनोभावे पूजे पूजा आर्च करून गणेश कथनाचे वाचन करावे हीच त्या गणेश महात्म्याची फलश्रुती आहे असंच म्हणावं लागेल.

## गणेश विसर्जन करतांना सर्वांनीच सावधगिरी बाळगावी व प्रशासनाच्या नियमांचे पालन करावे



सध्याच्या परिस्थितीत महाराष्ट्रासह देशातील अनेक भागात अतिवृष्टीमुळे, ढगफुटीमुळे अनेक भाग जलमग्न झालेला आहे.यामुळे काही भागातील नदी-नाले,तलाव,विहिरी व समुद्र किनारा या सर्व तुडुंब भरलेल्या आहेत. गणपती स्थापनेच्या दिड दिवसांपासून गणपती बाप्पाच्या विसर्जनाला सुरूवात झालेली आहे.त्यामुळे बाप्पाचे विसर्जन करतांना सर्वांनीच सावधगिरी बाळगणे आवश्यक आहे.कारण गणपती विसर्जन करतांना नदी,तलाव, विहीर, समुद्र किनारा याठिकाणी कळत-नकळत दुर्घटना होऊ शकते याला नाकारता येत नाही आणि अशा प्रकारच्या यापूर्वी अनेक दुर्घटना झालेल्या आहेत ही बाब सर्वांनाच ग्यात आहे.मागील वर्षी २०२४ ला राज्यभरात गणेश विसर्जनाला गालबोट लागले व १५ जणांचा मृत्यू झाला.धुळ्यातील चितोड येथे ३ बालकांचा मृत्यू झाला, नाशिक येथील पाथर्डी फाटा परिसरात २ युवकांचा मृत्यू झाला, अमरावती जिल्ह्यातील अचलपूर तालुक्यात ३ जण नदित वाहुन गेले, अहमदनगर जिल्ह्यात २ युवकांचा मृत्यू, जिंतूर तालुक्यात २ जणांचा मृत्यू, अकोला जिल्ह्यात एकाजणाचा मृत्यू.,त्यामुळे गणेश विसर्जन सावधगिरीने करावे.त्याचप्रमाणे लहान मुलांना विसर्जन स्थळापासुन दुरच ठेवावे. कारण छोटीशी चुक परिवारावर मोठा आघात करू शकते.कारण खेड्यापाड्यात, शहरात बाप्पाच्या विसर्जनाच्या वेळी भक्तगण विसर्जनाच्या ठिकाणी जातात. अशा परिस्थितीत कोणताही धोका ओढावून नये याची काळजी सर्वांनीच घेतली पाहिजे. गणेश विसर्जनासाठी तलावांवर बंदी आहेच.परंतु प्रशासनाने जे गणेश विसर्जनाचे ठिकाण(स्थळ)दिले आहे किंवा प्रशासनाने बनवीलेल्या कृत्रिम तलाव यामध्ये विसर्जन करायला हवे. यदाकदाचित एखादी अकस्मात घटना घडली तर प्रशासन आपल्या मदतीला धावून येवु शकते.त्यामुळे प्रशासनाचे नियम पाळुन सर्वांनी गणेश विसर्जनाचा आनंद घ्यावा व सावधगिरी बाळगवी. कारण आपण अनेकदा पाहिले व ऐकले सुध्दा आहे की मुर्ति विसर्जनाच्या वेळेस जिवीत हानी व दुर्घटना सुध्दा झालेल्या आहेत.या संपूर्ण गोष्टी डोळ्यासमोर ठेवून व सतर्कता बाळगुन गणेश विसर्जन केले पाहिजे. त्याचप्रमाणे सरकारने व प्रशासनाने घालून दिलेल्या नियमांचे काटेकोरपणे पालन करणे गरजेचे आहे. ज्या-ज्या ठीकाणी कृत्रीम तलाव (आर्टीफीशीयल टँक)ची व्यवस्था केलेली आहे, त्या-त्या ठिकाणी त्याचा उपयोग सर्वांनीच केला पाहिजे.परंतु ज्या ठिकाणी कृत्रिम तलावांची व्यवस्था नाही असे भक्तगण नदी,विहीर, समुद्र किनारा,किंवा तलावामध्ये गणरायाचे विसर्जन करतात त्या-त्या ठिकाणी सर्वांनीच विसर्जन करतांना काटेकोरपने सावधगिरी बाळगणे अत्यंत गरजेचे आहे.मुख्यत्वेकरून मंडळांचे मोठे गणपती असतात.अशा परिस्थितीत मंडळाच्या भक्तांनी गणपती विसर्जन करतांना सतर्कता बाळगून व प्रशासनाच्या नियमांचे पालन करून विसर्जन करावे.कारण छोटीशी चुक मोठा आघात पोहचवु शकते याला नाकारता येत नाही आणि याचे दुःख संपूर्ण परिवाराला व मंडळाला भोगावे लागते.गणेश विसर्जनाच्या निमित्ताने हेच सांगु इच्छितो की बाप्पांना निरोप देतांना गणेश विसर्जनाची प्रक्रीया सांभाळून करावी. त्याचप्रमाणे ''निर्माल्य'' तलाव, विहीर, नदी, समुद्र किनारा यामध्ये न टाकता प्रशासनाने निर्माल्याची व्यवस्था ज्या ठिकाणी केली आहे त्याठिकाणीच टाकावे.यामुळे प्रदूषणावर आवर घातला येईल व पाणी दुषित होण्यापासुन वाचेल. सोबतच जलचर प्राण्यांचे प्राणसुध्दा वाचेल.अशाप्रकारे संपूर्ण गणेश भक्तांनी काळजी घेणे आवश्यक आहे.गणपती बाप्पा आपल्या घरी दरवर्षी येणार.कारण गणेश विसर्जन करतांना गणपती बाप्पा मोरया पुढच्या वर्षी लवकर या!असा जयघोष करून बाप्पाणा आपण निरोप देवून विसर्जन करतो.परंतु गणेश विसर्जनाच्या निमित्ताने गणेश भक्तांनी आपल्या परिसरात एकतरी वृक्ष लावुन गणरायाला निरोप द्यावा.यामुळे गुरांना चारा,सर्वांना शुद्ध हवा व ऑक्सिजन मिळण्यास मोठी मदत होईल. कारण आज कोणत्या ना कोणत्या पद्धतीने वृक्ष लागवड करणे काळाची गरज आहे.''गणपती बाप्पा मोरया पुढच्या वर्षी लवकर या'' जय श्री गणेशाय नमः!

रमेश कृष्णराव लांजेवार,
नागपूर

हे जरनल संपादक व प्रकाशक संजय व्यापारी यांनी विंग बी३, फ्लॅट नं.७०१, व्हिसलिंग पाम्स हौ.सो., मानकर चौक, कस्पटे वस्ती, वाकड, पिंपरी-चिंचवड, महाराष्ट्र ४११०५७ येथून प्रकाशित केले. (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत) E-mail-jyotirmaysahitya@gmail.com, Mob. 7743818559